# पूर्व उच्च प्राथमिक/पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी / इ. ८ वी) फेब्रुवारी - २०१९

**PRE UPPER PRIMARY/PRE SECONDARY SCHOLARSHIP EXAMINATION (PUP/PSS) STD. 5th & 8th**

**शाळा नोंदणी (School Registration) व शाळा माहिती प्रपत्र (School Profile) भरण्याबाबत मुद्देनिहाय सूचना**

- शाळा नोंदणी (School Registration) प्रपत्रात भरलेली माहिती अचूक असल्याची खात्री स्वत: मुख्याध्यापकांनी करावी.
- शाळा नोंदणी, शाळा माहिती प्रपत्र व ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याच्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
- माहिती अचूक असल्याची खात्री झाल्यानंतरच Submit & Confirm बटनावर Click करावे.
- Submit & Confirm बटनावर Click केल्यानंतर माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

## शाळा नोंदणी (School Registration)

- www.mscepune.in अथवा http://puppss.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर भेट दयावी.
- संकेतस्थळावरील **उपक्रम** या मथळयाखालील **शाळा नोंदणी** या बटनावर क्लिक करावे.
- शाळा नोंदणी या बटनावर क्लिक केल्यानंतर शाळा नोंदणी फॉर्म उपलब्ध होईल. तो भरण्यासाठी खालीलप्रमाणे मुद्देनिहाय सूचना देण्यात येत आहेत.

### UDISE सांकेतांक -

- या मुद्दयापुढील चौकटीत आपल्या शाळेचा 11 **अंकी** UDISE सांकेतांक टाईप करावा.
- त्यानंतर स्क्रिनवर आपल्या शाळेचे नाव दिसेल. सदर नाव आपल्या शाळेचे असल्यास Yes बटनावर क्लिक करावे अन्यथा No बटनावर क्लिक करावे.
- शाळेच्या माहितीत काही दुरुस्ती / बदल करावयाचा असल्यास तो करता येईल.

### शाळेचे पूर्ण नाव -

- या मुद्यापुढील चौकटीत आपल्या शाळेचे UDISE सिस्टममध्ये नमूद केलेले नाव आपोआप (By Default) येईल.
- शाळेच्या नावात काही दुरुस्ती असल्यास ती करण्यात यावी.

### शाळा व्यवस्थापन प्रकार -

- या मुद्दयापुढील चौकटीच्या ड्रॉप डाऊन लिस्ट मधील अचूक पर्याय निवडा.
  (ड्रॉप डाऊन लिस्ट - केंद्र शासन, राज्य शासन, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, नगरपरिषद, कटकमंडळ, ग्रामपंचायत, खाजगी मान्यताप्राप्त अनुदानित, खाजगी मान्यताप्राप्त विनाअनुदानित, खाजगी मान्यताप्राप्त कायम विनाअनुदानित व स्वयं अर्थसहाय्यित)

### शाळेत शिकविला जाणारा अभ्यासक्रम-

- आपल्या शाळेत जो अभ्यासक्रम शिकविला जातो, तो पर्याय अचूकपणे निवडा.
- एकापेक्षा जास्त अभ्यासक्रम शाळेत शिकविले जात असतील तर जेवढे पर्याय लागू आहेत तेवढे सर्व पर्याय निवडावेत.
- **येथे निवडलेलेच अभ्यासक्रम विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी उपलब्ध होतील.**

- **लक्षात ठेवा -**
  - केवळ महाराष्ट्र शासनाचा (एमएससीईआरटी / विद्या प्राधिकरण) अभ्यासक्रम राबविणा-या शाळांतील विद्यार्थी गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीस पात्र ठरतात.
  - CBSE/ICSE/इतर या अभ्यासक्रमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात नाही. (संदर्भ : शासन निर्णय. SPE/२००१/९३९७९/(२००३/२००१) साशि - १, दिनांक १० ऑक्टोबर, २००१)
  - ऑनलाईन आवेदनपत्रात चुकीचा अभ्यासक्रम नोंदविल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांवर राहील. अशा मुख्याध्यापकांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याची शिफारस करण्यात येईल.

**शाळा माध्यम -**

- या मुद्दयाच्या ड्रॉप डाऊनमध्ये उपलब्ध असलेल्या **पंधरा माध्यमांपैकी (मूळ व सेमी इंग्रजी माध्यमांसह)** शाळेस लागू असलेले माध्यम निवडा.
- एकापेक्षा अधिक माध्यमातून शिक्षण दिले जात असेल तर जेवढया माध्यमातून शाळेत शिक्षण दिले जात आहे तेवढया सर्व माध्यमांच्या पर्यायांची अचूकपणे निवड करावी.
- **येथे निवडलेले / निवडलेली माध्यमेच विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन आवेदनपत्रात उपलब्ध होतील.**

**शाळेचा प्रकार -**

- आपली शाळा कोणत्या प्रकारची **'आश्रमशाळा'** आहे ते ड्रॉप डाऊनमधील पहिल्या तीन पर्यायांमधून निवडा.
- आपली शाळा कोणत्याही प्रकारची आश्रमशाळा नसल्यास **'आश्रमशाळा व्यतिरिक्त इतर शाळा'** हा शेवटचा पर्याय निवडावा.

**क्षेत्र -**

- या मुद्दयाच्या ड्रॉप डाऊनमधून शाळेच्या क्षेत्राची अचूक निवड करावी.
- गावाची लोकसंख्या विचारात न घेता ग्रामपंचायत क्षेत्रात असलेल्या शाळांनी ग्रामीण या क्षेत्राचीच निवड करावी. (संदर्भ - शासन निर्णय. विशेष-२००५/(४७/०५) साशि-१, मंत्रालय, मुंबई, दि.३१ ऑक्टोबर, २००५)
- ग्रामपंचायत वगळता इतर कोणतीही शासनसंस्था (स्थानिक स्वराज्य संस्था) असलेल्या नगर / शहरातील शाळांनी शहरी (URBAN) या पर्यायाचीच निवड करावी.
- **लक्षात ठेवा** - ग्रामीण व शहरी क्षेत्रासाठी वेगवेगळे शासनमान्य शिष्यवृत्ती संच आहेत. चुकीचे क्षेत्र निवडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहील. अशा मुख्याध्यापकांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याची शिफारस करण्यात येईल.

**शाळेचा ई-मेल आयडी -**

- शाळेचा ई-मेल आयडी इंग्रजी स्मॉल लेटर्समध्ये व अचूक फॉरमॅटमध्ये टाईप करावा.
- त्यानंतर Confirm School Email Id या ऑप्शनमध्ये शाळेचा ई-मेल आयडी इंग्रजी स्मॉल लेटर्समध्ये व अचूक फॉरमॅटमध्ये पुन्हा टाईप करावा.
- येथे नोंदविलेल्या ई-मेल आयडीवर आपणास Username व Password पाठविण्यात येईल.

**शाळेस इंटरनेट कनेक्शन आहे का?**

- या मुद्दयापुढील होय / नाही पैकी योग्य पर्याय निवडावा.

**शाळेचा पूर्ण पत्ता -**

- **स्थानिक पत्ता -**
    - घर नंबर, सर्व्हे नंबर, रस्ता, वॉर्ड, पेठ, क्षेत्र व जवळची खूण चौक, स्टेशन, स्टँड, हॉस्पीटल, इत्यादीच्या जवळ अशी माहिती या मुद्दयासमोरील चौकटीत शाळेचा पूर्ण पत्ता इंग्रजी कॅपिटल लेटर्स मध्ये टाईप करा.
    - येथे शाळेचे नाव टाईप करण्याची आवश्यकता नाही.
- **गाव/शहर -**
    - या मुद्दयाखालील चौकटीत आपल्या गावाचे / शहराचे नाव इंग्रजी कॅपिटल लेटर्स मध्ये टाईप करा.
- **पोस्ट -**
    - या मुद्दयाखालील चौकटीत पोस्ट (पोस्टाचे ठिकाण व गाव) इंग्रजी कॅपिटल लेटर्स मध्ये टाईप करा.
- **तालुका / तहसिल -**
    - जिल्ह्याची निवड केल्यानंतरच या मुद्याखालील चौकटीत ड्रॉप डाऊन लिस्टमधील आपला तालुका / WARD अचूकपणे निवडावा.
    - लक्षात ठेवा - शहरांतील शाळांनी विशेषत: नगरपालिका / महानगरपालिका क्षेत्रातील शाळांनी आपल्या तालुक्याची / WARD ची निवड करण्यापूर्वी वॉर्ड ऑफिसर / शिक्षण उपनिरीक्षक / शिक्षण प्रमुख / प्रशासन अधिकारी / गटशिक्षणाधिकारी / शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक यांचेशी संपर्क साधावा.
- **जिल्हा -**
    - या मुद्दयाखालील चौकटीत आपली शाळा ज्या जिल्ह्यात आहे, तो जिल्हा ड्रॉप डाऊन लिस्टमधून अचूकपणे निवडा.
    - मुंबई शहरातील शाळांनी आपली शाळा मुंबई BMC किंवा मुंबई DYD या दोन पैकी कोणत्या जिल्ह्यात आहे तो जिल्हा अचूकपणे निवडावा.
    - उपरोक्तबाबत शंका असल्यास गटशिक्षणाधिकारी / वॉर्ड ऑफिसर / शिक्षण उपनिरीक्षक / शिक्षण निरीक्षक / शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याशी संपर्क साधावा.
- **पिन कोड -**
    - यामध्ये सहा अंकी पोस्टल पिन कोड नमूद करा.
- **दूरध्वनी क्रमांक -**
    - STD कोडसह शाळेचा दूरध्वनी क्रमांक नमूद करा. शाळेस दूरध्वनी नसल्यास मुख्याध्यापकांचा मोबाईल क्रमांक टाकावा.

**शाळा संलग्नता शुल्क -**

- **हे शुल्क दरवर्षी शाळेने भरणे आवश्यक आहे.** NTS **किंवा** NMMS **परीक्षेसाठी शाळा संलग्नता शुल्क भरले असले तरी शिष्यवृत्ती परीक्षेकरीता शाळा संलग्नता शुल्क रु.**200/- **भरणे अनिवार्य राहील.**

**मुख्याध्यापकाची माहिती -**

- या मुद्दयामधील पाच वेगवेगळया चौकटीत अनुक्रमे मुख्याध्यापकांचे आडनाव, प्रथम नाव, मधले नाव, मोबाईल क्रमांक (१० अंकी), ई-मेल आयडी अचूकपणे इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये टाईप करा.
- येथे नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर आपणास Username व Password पाठविण्यात येईल.

उपरोक्तनुसार सर्व माहिती भरुन झाल्यानंतर पुन्हा एकदा तपासून माहिती अचूक असल्याची खात्री करुनच Submit बटनावर क्लिक करावे.

## शाळा माहिती प्रपत्र (School Profile)

- शाळा नोंदणी मधील Submit बटनावर क्लिक केल्यानंतर शाळा नोंदणी प्रपत्रात नमुद केलेल्या शाळेच्या ई-मेल आयडी व मुख्याध्यापकाच्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त झालेल्या Username व Password च्या आधारे लॉगीन करावे.
- त्यानंतर शाळा नोंदणी प्रपत्रामध्ये नमुद केलेली सर्व माहिती आपणास दिसेल. त्यामध्ये काही बदल करावयाचा असल्यास तो करावा.
- तसेच संपर्कासाठी वैकल्पिक मोबाईल क्रमांक अथवा दुरध्वनी क्रमांक नमुद करावा.
- मुख्याध्यापकांचा फोटो व स्वाक्षरी शाळा माहिती प्रपत्रात अपलोड करणे अनिवार्य आहे.
    - मुख्याध्यापकांचा फोटो व स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यपध्दती - ८.५ से.मी. X ४.५ से. मी. आकाराच्या पांढऱ्या कागदावर रंगीत फोटो चिकटवून त्याखाली **काळया शाईच्या पेनाने** स्पष्ट स्वाक्षरी करावी. सदरचा फोटो व स्वाक्षरी स्कॅन करावी.
    - फोटो व स्वाक्षरी .JPG, .JPEG किंवा .PNG या फॉरमॅटमध्ये सेव्ह करावी.
    - फोटो व स्वाक्षरीची साईज १०० kb पेक्षा जास्त नसावी.
- उपरोक्तनुसार सर्व माहिती भरुन झाल्यानंतर पुन्हा एकदा तपासून माहिती अचूक असल्याची खात्री झाल्यानंतरच Submit & Confirm बटनावर Click करावे.
- Submit & Confirm बटनावर Click केल्यानंतर माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

**टिप -**

- उपरोक्त मुद्दयांबाबतच्या पुराव्याची कागदपत्रे शाळेत जतन करुन ठेवावीत.
- परीक्षा परिषदेच्या सूचनेप्रमाणे परिषदेस कागदपत्रांची आवश्यकता असेल तेव्हा ती परिषदेच्या सूचनेप्रमाणे परिषदेकडे सादर करण्यात यावीत.
- उपरोक्त कार्यवाहीत कसूर झाल्यास संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस केली जाईल याची नोंद घ्यावी.